नि.दि.दा. क्र.३७/२०१७
मंजूलाबाई वि. गणपत
नि.क्र.९०

**वादी तर्फे साक्षदार क्र २ चा अधिकचा सरतपास श्री. एम. डी. पालीवाल वकील साहेब मार्फत शपथेवर सुरुः**

**१**. मी माझ्या पुराव्याचे प्रतिज्ञापत्र नि.क्र.९० वर दाखल केला आहे त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे लिहीला असुन तो खरा व बरोबर आहे.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास पूढील तारखेपर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर स्विकृत | समक्ष

(जी.ओ. वानखडे)
दि.न्या. क. स्तर, पारशिवनी

(जी.ओ. वानखडे)
दि.न्या. क. स्तर, पारशिवनी

दिनांकः ११/०८/२०२५

**<u>दि. १६/०९/२०२५ रोजी वादीतर्फे साक्षदार क्र २ चा उलटतपास प्रतिवादी क्र. १ करिता श्री. पी. एस. सायरे वकील साहेब मार्फत शपथेवर सुरुः</u>**

२. माझे शिक्षण वर्ग ६ पर्यंत झालेले आहे. माझा जन्म सन १९५५ मध्ये बखारी पिपला या गावी झाला. माझ्या आईचा मृत्यू सन २०२४ मध्ये झाला. मृत्यूसमयी माझ्या आईचे वय अंदाजे ९० वर्षे होते. माझ्या आईचे लग्न कोणत्या साली झाले हे मला माहीत नाही. माझ्या वडिलांचा मृत्यू १९६४ साली झाला. मी पारशिवणी येथे राहते तर कधी पंजाब येथे जाते. मी पारशिवणी येथे वार्ड नं. ३ खारी येथे राहते. खारी येथे माझे स्वतःचे घर आहे. माझी आई सुद्धा खारी येथे राहत होती. मी खारी येथे सन २०१६ पासून राहत आहे. मी व माझी आई पारशिवणी येथे सन २०१६ पासून राहायला आलो. माझे लग्न दि. ०६/०६/१९७४ रोजी झाले. मला पिपरिया तोतलाडोह येथे दिले होते. मी सन १९७५मध्ये पंजाब येथे राहायला गेली. हे म्हणणे खरे आहे की, सन १९७५ पासून माझे राहणे पंजाब येथे आहे. माझे आजोबा जानबाजी सन १९६५ साली मरण पावले. जानबाजी यांच्या मृत्यूचा दाखला माझ्याकडे उपलब्ध नाही. पारशिवणी येथे ग्रामपंचायत कार्यालय केव्हा स्थापन झाले याची मला माहिती नाही. माझे पुराव्याचे शपथपत्र इंग्रजी भाषेत आहे. साक्षीदार स्वतःहून सांगते की, माझ्या वकील साहेबांनी मला हिंदी भाषेत समजावून सांगितले आहे.

३. जानबाजी यांच्या नावे वादघर ९५८ चौ.फु. जागेवर होते.

प्रश्न – कथित वादघर जानबाजीच्या नावे होते याबाबतचा दस्त पाहिला होता काय ?.

उत्तर – तसा दस्त मी पाहिला नव्हता.परंतु, त्या ठिकाणी माझे ये–जाणे होते.

हे म्हणणे खरे नाही की, जानबाजीच्या नावे वादघर नव्हते. पारशिवणी शहराचा सिटी सवेर् केव्हा झाला याची मला माहिती नाही. मी वादातील घराची आखीव पत्रिका पाहिली नव्हती. मी वादातील घराची घर टॅक्स पावती पाहिली होती. मी वादातील घराचे टॅक्स पावती सन २०१६ पासून पाहत आहे. वादघराच्या टॅक्स पावतीवर आज रोजी मंजूळाबाई हिचे नाव आहे.

प्रश्न – तुम्ही वादघराची टॅक्स पावती अभिलेखावर दाखल करु शकता काय ?

उत्तर – होय.

हे म्हणणे खरे आहे की, वादातील घर वार्ड क्र. १ मध्ये आहे.

**उलटतपास पूढील तारखेपर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर स्विकृत समक्ष

**(जी.ओ. वानखडे)**
दि.न्या. क. स्तर, पारशिवनी

**(जी.ओ. वानखडे)**
दि.न्या. क. स्तर, पारशिवनी

दिनांकः १६/०९/२०२५

**दि. १०/११/२०२५ रोजी वादीतर्फे साक्षदार क्र २ चा  उलटतपास प्रतिवादी क्र. १ करिता श्री. पी. एस. सायरे वकील साहेब मार्फत शपथेवर सुरुः**

**४.** मी आज वाद घरातील टॅक्स पावती दाखल करणार आहे. हे म्हणणे खरे आहे की माझ्या आईची साक्ष झाली तेव्हा मी ती पूर्ण ऐकली. माझ्या आजोबाचे गाव कोणते होते हे मला आठवत नाही. माझे आजोबाला दोन ते तीन भाऊ होते. हे म्हणणे खरे आहे की, माझे आजोबा पोटगावचे होते असे मी ऐकले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आजोबांची पारशिवनी येथे कोणतीही जमीन नव्हती. जमीन माझ्या आजोबाने खरेदी केली होती. माझ्या आजोबाने धनकर यांच्याकडून जमीन खरेदी केली होती. माझ्या आईच्या जन्मापूर्वी माझ्या आजोबांनी जमीन खरेदी केली होती. आजोबांनी खरेदी केलेल्या जमीनीचे कागदपत्र मी पाहिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, माझे आजोबा मृत पावले तेव्हा माझी आई लहान होती. माझा जन्म १९५५ साली झाला. माझे आजोबा किती क्षेत्रफळ जमीनीचे मालक होते हे मी सांगू शकत नाही. माझ्या आईला किती क्षेत्रफळ जागा माझ्या आजोबांनी दिली हे मी आज सांगू शकत नाही. माझे मामा वसंताचा मृत्यू दि. २२/०४/२००८ रोजी झाला. वसंताने त्याचे घर कोणत्या साली बांधले हे मी सांगू शकत नाही. माझे मामाने जेव्हा घर बांधले होते तेव्हा माझ्या आईने कोणतीही हरकत घेतली नव्हती. गणपतची जागा किती होती हे मला माहीत नाही. परंतु, त्यात तीन हिस्से आहे. हे मी सांगू शकत नाही की, गणपतची ८५१.६५ चौ.फू. जागा होती किंवा काय. हे म्हणणे खरे आहे की, गणपतला त्याच्या हिस्सा विकायचा हक्क होता. हे म्हणणे खरे आहे की, दावा दाखल करता वेळी मी माझ्या आई बरोबर वकिलांकडे गेली होती. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पुराव्याचे शपथपत्र माझ्या सांगण्यानुसार तयार केले त्यातील मजकूर बरोबर आहे.  अभिलेखावर दाखल असलेले विक्रीपत्र मला माहीत आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. विक्रीपत्रास ओळखी बाबत **नि. क्र.९१** देण्यात येते.

प्रश्न – विक्रीपत्रचा दस्त तुम्हाला मंजूर आहे काय ?

उत्तर – त्याने विक्रीपत्राबाबत आम्हाला सांगितले नव्हते.

**उलटतपास पूढील तारखेपर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर स्विकृत समक्ष

**(जी.ओ. वानखडे)**
दि.न्या. क. स्तर, पारशिवनी

**(जी.ओ. वानखडे)**
दि.न्या. क. स्तर, पारशिवनी

दिनांकः १०/११/२०२५

**<u>दि. १५/१२/२०२५ रोजी वादीतर्फे साक्षदार क्र २ चा उलटतपास प्रतिवादी क्र. १ करिता श्री. पी. एस. सायरे वकील साहेब मार्फत शपथेवर सुरुः</u>**

५. वाद मिळकतीचे माझ्या आजोबांनी करुन घेतलेले विक्रीपत्र मी अभिलेखावर दाखल करु शकत नाही. सदर विक्रीपत्राची सत्यप्रत प्राप्त करण्याचा मी प्रयत्न केला नाही.

प्रश्न – तुमच्या आजोबांनी कोणत्याही प्रकारे वाद मिळकतीचे विक्रीपत्र करुन घेतले नाही. करिता तुम्ही सदर विक्रीपत्राची सत्यप्रत प्राप्त करुन घेण्याचा प्रयत्न केला नाही?

उत्तर – विक्रीपत्राच्या वेळेस मी लहान असल्याने मला विक्रीपत्राबाबत काही माहीत नाही.

माझा जन्म सन १९५५ मध्ये झाला. हे म्हणणे खरे आहे की, मी वाद मिळकतीची आखीवपत्रीका पाहिली होती. माझ्या आईचे नाव आखीव पत्रिकेवर आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.५२ वर माझ्या आईचे नाव नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आईचे नाव आखीव पत्रिकेवर कधीही नव्हते. मी माझ्या आईचे नाव आखीव पत्रिकेवर कोणतेही अपील दाखल केले नव्हते.

प्रश्न – तुमच्या आईने सर्वप्रथम वाद मिळकतीचा कर कोणत्या साली भरला ?

उत्तर – त्या बाबतची नोंद मी लिहून ठेवलेली नाही. माझी आई राहत होती तेव्हापासून ती कर भरीत होती.

हे म्हणणे खरे आहे की, माझ्या आईला वाद मिळकतीमध्ये हिस्सा सन २०१६ मध्ये मिळाला. सन २०१६ नंतर आखीव पत्रिकेवर माझ्या आईचे नाव चढविण्याचा प्रयत्न केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे आजोबा सन १९५३ मध्ये मृत पावले. हे म्हणणे खरे आहे की, मी गणपत याच्या घराचा क्रमांक सांगू शकणार नाही. मी मंजूळाबाई हिच्या घराचा क्रमांक सांगू शकत नाही, तो माझ्याकडे लिहीला आहे. हे मला माहीत नाही की गणपत याच्या घराचा क्रमांक ७८ आहे किंवा काय. माझ्या आईला खारी परिसरामध्ये घरकूल आता मिळालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की वसंता याने २००५–२००६ मध्ये वाद

मिळकतीमधील त्याच्या हिस्सावर घर बांधले आहे. हे म्हणणे खरे आहे की, वाद मिळकतीमध्ये गणपत यांचा सुद्धा हिस्सा आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझी आई वाद मिळकतीवर राहत होती तेव्हा विद्युत बिल भरीत होती. माझ्याकडे विद्युल बिलाची पावती नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझी आई वाद मिळकतीवर राहत नव्हती. त्याकारणाने माझ्याकडे विद्युत बिलाची पावती नाही. हे म्हणणे खरे आहे की, संपूर्ण वाद मिळकतीचे मी क्षेत्रफळ सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या आजोबांनी माझ्या आईला किती क्षेत्रफळ जागा दिली होती हे मी सांगू शकत नाही परंतु माझ्या आईला वाद जागेस हिस्सा दिला होता. मी माझ्या पुराव्याचे प्रतिज्ञापत्र संपूर्ण वाद मिळकतीचे क्षेत्रफळ सांगितले होते. मी वाद मिळकतीचे क्षेत्रफळ माझ्याकडे लिहीलेल्या कागदाच्या आधारे सांगितले होते. तो कागद कोणता आहे हे मला आज रोजी लक्षात नाही.

६. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या आजोबाचा मृत्यू झाल्यानंतर सदर दावा दाखल करेपर्यंत हिस्सा मिळण्याकरिता कोणतेही प्रकरण दाखल केले नाही. ग्रामपंचायात येते माझ्या आईच्या नावाची नोंद वाद मिळतीवर कोणत्या साली घेण्यात आली. ते मी सांगू शकत नाही. जेव्हापासून ती वाद मिळकतीवर राहत होती तेव्हापासून नोंद घेण्यात आली . वाद मिळकतीवर माझी आई सन १९६२ पूर्वीपासून राहत होती. हे म्हणणे खरे आहे की,माझ्या आजोबांच्या सासऱ्याने माझ्या आजोबाला काम करण्याकरिता पारशिवनी येथे आणले होते

**उलटतपास पूढील तारखेपर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर स्विकृत

GAJENDRA ONKARRAO WANKHADE Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE Date: 2025.12.15 17:59:13 +0530

**(जी.ओ. वानखडे)**
दि.न्या. क. स्तर, पारशिवनी

समक्ष

GAJENDRA ONKARRAO WANKHADE Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE Date: 2025.12.15 17:59:16 +0530

**(जी.ओ. वानखडे)**
दि.न्या. क. स्तर, पारशिवनी

दिनांकः १५/१२/२०२५